जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४६०        दिनांक - २३/०६/२०२३**

**भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**मोक्यामध्ये सहा महीन्यापासुन फरार असलेला आरोपी साकीब मेहमुद चौधरी उर्फ लतीफ बागवान हया मुख्य सुत्रधारास केले जेरबंद**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुरनं.११९/२०२३,भा.द.वि.कलम ३०७,३२३,१४३,१४४,१४७, १४८,१४९,आर्म अॅक्ट ४(२५),म पो अ कलम ३७(१)(३)१३५,महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(ii)३(२)३(४) या गुन्हयातील टोळी प्रमुख आरोपी साकीब मेहबुब चौधरी ऊर्फ लतिफ बागवान हा मिळुन येत नव्हता.

टोळी प्रमुख आरोपी **साकीब मेहबुब चौधरी ऊर्फ लतिफ बागवान,वय-२३ वर्षे,रा. लुनिया बिल्डींग,कदम चाळ,संतोषनगर,कात्रज,पुणे** हा गुन्हा घडल्यापासुन फरार कालावधीत तो त्याचे अस्तीत्व लपवुन वारंवार वेग-वेगळया जिल्हयांमध्ये त्यांची ओळख व ठाव ठिकाण बदलुन वास्तव करीत होता. त्याने त्या दरम्यान कात्रज अणि संतोषनगर परीसरात स्वःताचे टोळीची दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होता.

सदर आरोपीताचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी वारंवार बाहेरील जिल्हयामध्ये गुप्त बातमीदारांचे नेटवर्क सक्रीय करुन व तांत्रिक विश्लेषणा वरुन शोध घेत असताना पोलीस अंमलदार विक्रम सावंत, अभिजीत जाधव, निलेश ढमढेरे यांना आरोपी साकीब मेहबुब चौधरी ऊर्फ लतिफ बागवान येथे राहत आहे अशी खात्रीशीर माहीती मिळाली.

त्या अनुशंगाने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी निरा,ता.पुरंदर,जि.पुणे येथे जावुन आरोपी साकीब मेहबुब चौधरी ऊर्फ लतिफ बागवान याचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी गुन्हयाचे तपासी अधिकारी श्री.नारायण शिरगावकर,सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांनी सदर आरोपीतास अटक केली आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे, श्री.प्रविणकुमार पाटील,मा.पोलीस उप-आयुक्त परि २ श्रीमती.स्मार्तना पाटील,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विजय कुंभार, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),विजय पुराणिक, सहा.पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ,पोलीस उप निरीक्षक, सागर भोसले, पोलीस अंमलदार,विक्रम सावंत,अभिजीत जाधव,निलेश ढमढेरे,चेतन गोरे,मंगेश पवार,हर्षल शिंदे,अवधुत जमदाडे,सचिन सरपाले,धनाजी धोत्रे,सचिन गाडे,निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी, अशिष गायकवाड,राहुल तांबे,यांच्या पथकाने केली आहे.


राज्य पोलीस
भारती विद्यापीठ, पुणे
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे
श्री विजय कुंभार
वरिष्ठ पोलीस निरीक्षक